पुढारी

# फिनोलेक्स, मुकुल माधवतर्फे अन्नधान्य वाटप

**पुणे :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनतर्फे वनवासी कल्याण आश्रम यांच्या सहकार्याने २५०० आदिवासी कातकरी समाजातील कुटुंबांना अन्नधान्य वाटप करण्यात आले. मावळ, भोर, वेल्हा, खेड, जुन्नर, आंबेगाव या सहा तालुक्यातील कातकरी कुटुंबांचा यात समावेश आहे. मावळ तालुक्यातील टेमघर धरण पायथ्याशी असलेल्या लव्हार्डे या गावातून या उपक्रमाची सुरुवात झाली.

या वेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीचे उपाध्यक्ष (कमर्शियल्स) बी. आर. मेहता, वनवासी कल्याण आश्रमचे मनोज पोचत, दिलीप मेहता, प्रकाश किचडे, विनायक खाडे, महेश भुस्कुटे, मिलिंद करमरकर, सुरेश हणमंते, सुनील भोसले, स्थानिक समन्वयक विशाल भुरूक, मुकुल माधव फाउंडेशनचे प्रतिनिधी जितेंद्र जाधव उपस्थित होते.

मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालक रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, रानावनातील मेवा गोळा करून त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या या कातकरी समाजाची अडचण वनवासी कल्याण आश्रमाने मांडली. भविष्यातही समाजातील सर्वच वंचितांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न आहे.

बी. आर. मेहता म्हणाले, गेल्या वर्षभरात फिनोलेक्स आणि मुकुल माधव फाउंडेशनने देशभरातील सर्वच स्तरातील वंचित घटकांना अन्नधान्य, औषधे, वैद्यकीय साहित्य व अन्य जीवनावश्यक वस्तू पुरविण्याचे कार्य केले आहे.

Pune Edition
Jun 15, 2021 Page No. 8
newspaper.pudhari.co.in